# भारती विद्यापीठ मध्यवर्ती कार्यालय, पुणे ३०.

जा.क्र.: भा.वि./म.का./६३५५/२०२०-२०२१ दिनांक : ०६/०८/२०२०

**परिपत्रक -महत्वाचे**

प्रति,
शाखा/विभागप्रमुख,
भारती विद्यापीठ व
भारती विद्यापीठ अभिमत विश्वविद्यालय
पुणे व इतर केंद्रे,

विषय :- इन्शुरन्स पॉलिसीबाबत

गेल्या काही महिन्यांपासून भारतासह सर्व जगामध्ये कोविड-१९ या विषाणू व्हायरस संसर्गाने थैमान मांडले आहे. कोरोना संसर्गामुळे जगभरात कोट्यावधी लोक बाधित झाले असून दुर्दैवाने हजारो लोक मृत्यूमुखीही पडले आहेत व पडत आहेत. या महामारीवर मात करण्यासाठी विविध देशातील हजारो शास्त्रज्ञ रात्रंदिवस संशोधन करीत आहेत आणि त्यांच्या या प्रयत्नाला आता यश प्राप्त होण्याचे संकेत दिसू लागले आहेत. भारत सरकार आणि विशेषतः महाराष्ट्र सरकार कोरोनाच्या या महामारीविरुध्द लढा देण्यासाठी विविध प्रकारच्या प्रतिबंधात्मक उपाययोजना करीत आहेत. त्यांच्या या कार्यात प्रशासकीय यंत्रणेबरोबरच डॉक्टर, परिचारिका, वैद्यकीय सेवेतील कर्मचारी, सफाई कामगार आणि पोलीसांचा सहभागही मोठा आहे.

मा. डॉ. पतंगरावजी कदम साहेब यांनी सामाजिक परिवर्तनाच्या ध्येयास अनुसरुन स्थापन केलेल्या भारती विद्यापीठ संस्थेने शैक्षणिक कार्याबरोबरच सामाजिक कृतज्ञतेचे भान नेहमीच जपले आहे. या उद्देशातून मा.साहेबांनी निःपक्षपातीपणे सर्वांना सर्वतोपरी सहाय्य केले आहेत. भारती विद्यापीठ संस्था म्हणजे आमचा एक मोठा परिवार आहे, असे साहेब नेहमी म्हणत असत. भारती विद्यापीठाच्या कुटूंबातील सर्व घटकांची ते सतत आस्थापूर्वक काळजी घेत असत. मा.साहेबांच्या या कार्याचा आदर्श घेऊन संस्थेने कोरोना महामारीच्या संकटापासून आपल्या भारती विद्यापीठ कुटुंबातील सर्वांच्या जीविताचे रक्षण व्हावे म्हणून प्रतिबंधात्मक उपाय योजिले आहेत.

**त्या अनुषंगाने संस्थेने, संस्थेच्या सेवकांसाठी 'खास बाब' म्हणून खालीलप्रमाणे दोन स्वतंत्र विमा योजना कार्यान्वित करण्याचा निर्णय घेतला आहे.**

१) **कोविड -१९ इन्शुरन्स प्लॅन ( चोलामंडलम् एम्.एस्. जनरल इन्शुरन्स कंपनी) :-**

या विमा योजनेतंर्गत दि. 3 ऑगस्ट २०२० पासून जर कोणी सेवक कोरोना संक्रमणाने बाधित झालेचे आपल्या निदर्शनास आल्यास लगेचच त्या संदर्भातील प्रस्ताव आवश्यक त्या कागदपत्रांसह **पाच दिवसांचे आंत** अर्ज सादर केल्यास सदर सेवकास कोविड-१९ अंतर्गत रुपये ५०,०००/- अर्थ सहाय्य मिळेल.

..२

Email to all teaching & non-teaching staff.
[signature] 14/08/2020.
Mr. Pathan - email to all staff
[signature]

२) **टर्म इन्शुरन्स प्लॅन (मॅक्स लाईफ इन्शुरन्स कंपनी)** :-

या विमा योजनेतंर्गत दिनांक २३ जुलै २०२० पासून जर कोणाही कर्मचाऱ्याचा कोरोना वा अन्य कोणत्याही आजाराने दुर्देवी मृत्यू झाल्यास त्या सेवकाच्या कुटुंबियास रुपये ५,००,०००/- (अक्षरी रुपये पाच लाख फक्त) मिळतील. याकरिता संबंधित शाखेने सदर सेवकाच्या कुटुंबाशी संपर्क साधून आवश्यक ती कागदपत्रे उपलब्ध करुन घेऊन त्या संबंधित सर्व कागदपत्रांसह प्रस्ताव **दहा दिवसांचे आंत** सादर करणे आवश्यक आहे.

जर आपल्या शाखा/विभागातील सेवक कोरोना संक्रमणाने बाधित (positive) झाल्याचे आढळल्यास शाखा/विभागप्रमुखांनी लगेचच त्याची माहिती संस्थेने नेमलेल्या समन्वयकांना पाठवावी. या कामी उच्च शिक्षण शाखा/विभागांसाठी समन्वयक म्हणून मध्यवर्ती कार्यालयातील सेवक श्री. महेश आनंदराव शिंदे ( मो.नं. ९८५०५३८५५१ व ई मेल आय्.डी. mahesha.hello@gmail.com) व शालेय शिक्षण विभागासाठी समन्वयक म्हणून श्री.विजय सदाशिव कदम (मो.नं. ८७६६५८३४६५ व ई मेल आय्.डी. vijaykadam1972@gmail.com) यांची नेमणूक केलेली आहे. या समन्वयकांकडून त्यासंदर्भातील फॉर्म उपलब्ध करुन घेऊन ऑनलाईन पध्दतीने भरावा व तो प्रस्ताव आवश्यक त्या सर्व कागदपत्रांसह **covidcare@cholams.murugappa.com** आणि **manas.shah@marsh.com** या ई मेल आय्.डी. वर त्वरीत पाठवावा व सदर इन्शुरन्स कंपनीला केलेली ई मेलची सी.सी. मध्यवर्ती कार्यालयातील वरील समन्वयकांना पाठवावी म्हणजे पुढील कार्यवाही करणे सुकर होईल. या संदर्भात काही अडचणी आल्यास संबंधीत विमा कंपनीचे प्रतिनिधी श्री.मानस शहा (मो.नं.७३९१०५७००१) यांचेशी संपर्क साधावा.

त्याचप्रमाणे टर्म इन्शुरन्स संदर्भान्वये जर एखाद्या सेवकाचा दुर्देवी मृत्यू झाल्यास त्यासंदर्भातही शाखा/विभागप्रमुखांनी वरीलप्रमाणे कार्यवाही करावयाची आहे.

शाखा/विभागप्रमुखांनी स्वत: तातडीने समक्ष लक्ष घालून ही विमा योजना कार्यान्वित करण्याची दक्षता घ्यावी. सोबत दोन्ही इन्शुरन्ससंदर्भातील माहिती, नमुना फॉर्म व इतर संबंधित कागदपत्रे जोडली आहेत.

**( डॉ. विश्वजीत कदम )**
कार्यवाह,
भारती विद्यापीठ, पुणे.

सोबत : वरीलप्रमाणे.

प्रत माहितीसाठी :-

१) मा. कुलपती, भारती विद्यापीठ अभिमत विश्वविद्यालय, पुणे
२) मा.कुलगुरु, भारती विद्यापीठ अभिमत विश्वविद्यालय, पुणे
३) मा. निवासी कार्यालय, भारती विद्यापीठ, पुणे.
४) मा. सहकार्यवाह(वित्त), भारती विद्यापीठ, पुणे
५) मा. सहकार्यवाह (प्रशासन), भारती विद्यापीठ,पुणे.
६) मा.कुलसचिव, भारती विद्यापीठ अभिमत विश्वविद्यालय, पुणे.
७) मा. संचालक(वित्त व लेखापरीक्षण), भारती विद्यापीठ, पुणे